# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ११० वा गुरूवार दि.०३ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्यूला जवळपास फायनल?

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये मिळालेल्या दणदणीत विजयानंतर राज्यातील विरोधी पक्ष असलेल्या महाविकास आघाडीचा आत्मविश्वास कमालीचा वाढलेला आहे. दरम्यान, आता अवघ्या काही दिवसांवर आलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून नियोजनबद्ध तयारी सुरू आहे.

तसेच तीन प्रमुख पक्ष एकत्र आल्याने निर्माण होऊ शकणारा जागावाटपाटा तिढा सोडवण्यासाठीही महाविकास आघाडीकडून एकेक पाऊल सावधपणे टाकलं जात आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीसाठीचा महाविकास आघाडीतील जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास फायनल झाल्याचं वृत्त आहे. तसेच या जागावाटपाच्या फॉर्म्युल्यानुसार विधानसभेसाठी काँग्रेसला सर्वाधिक जागा देण्यात येणार आहे. त्याखालोखाल शिवसेना उबाठा पक्षाला आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला जागा दिल्या जाणार आहेत.दरम्यान, महाविकास आघाडीमधील जागावाटपाबाब जो फॉर्म्युला समोर येत आहे त्यानुसार लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला विधानसभेच्या जागावाटपात सर्वाधिक जागा दिल्या जातील. काँग्रेसला १०० ते १०५ जागा मिळतील, असे सांगण्यात येत आहे. त्याखालोखाल शिवसेना उबाठा पक्षाला ९५ ते १०० जागा दिल्या जातील. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ८० ते ८५ जागा दिल्या जातील, अशी माहिती समोर येत आहे.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्वाधिक जागा जिंकल्या




होत्या. त्यामध्ये काँग्रेसने १३+१ (अपक्ष), शिवसेना उबाठा पक्षाने ९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने ८ जागांवर विजय मिळवला होता. लोकसभा निवडणुकीतील विधानसभा मतदारसंघ निहाय आघाडी पाहिल्यास काँग्रेसला ६३, शिवसेना उबाठा पक्षाला ५६ आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला ३२ जागांवर आघाडी मिळाली होती.

दुसरीकडे राज्यातील महायुतीमधील घटकपक्षांचाही जागावाटपाचा फॉर्म्युलाही फायनल झाल्याचे सांगण्यात येत आहे. या फॉर्म्युल्यानुसार भाजपा १५५ ते १६०, शिवसेना शिंदे गट ७३ ते ७५ आणि अजित पवार गटाला ६० ते ६२ जागा मिळण्याची शक्यता आहे.

## रेणापूर पंचायत समिती फर्निचर व इतर कामासाठी आ.कराड यांच्या प्रयत्नातून साडेतीन कोटीचा निधी

लातूर :- रेणापूर पंचायत समिती इमारतीचे बांधकाम गेल्या १० वर्षांपूर्वी झाले असून या इमारतीतील फर्निचर व इतर नूतनीकरण कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून तब्बल तीन कोटी ६६ लक्ष ५६ हजार रुपयांचा निधी राज्याच्या ग्रामविकास विभागामार्फत २६ सप्टेंबर २०२४ रोजी च्या शासन निर्णय परिपत्रकानुसार मंजूर झाला आहे.

रेणापूर पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रस्तावित केल्यानुसार, पूर्ण झाले असून प्रस्तुत इमारतीचा वापर गेली १० वर्षापासून करण्यात येत आहे. सदर इमारतीमधील खराब झालेली फरशी, दरवाजे बदलणे, खराब झालेले प्लास्टर काढून नव्याने प्लास्टर करणे, गळती प्रतिबंधक उपाय करणे, स्वच्छता विषयक जलनि:स्सरणाचे कामे, तसेच प्रस्तुत इमारतीमध्ये शिक्षण, आरोग्य, ग्रामीण पाणी पुरवठा, पशुसंवर्धन, बांधकाम, रोहयो इत्यादी विभागांसाठी टेबल, खुर्ची इ. फर्निचरची व्यवस्था नसल्याने त्याचबरोबर सुरक्षेच्या दृष्टीने इमारतीच्या बाजूने संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ता व नाले, इतर बाबींची गरज आहे. पंचायत समितीची ही गरज लक्षात घेऊन या कामासाठी निधी मिळावा याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री मा. गिरीशजी महाजन यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने २६ सप्टेंबर २०२४ रोजी च्या शासन निर्णय परिपत्रकानुसार रेणापूर पंचायत समिती इमारतीच्या फर्निचर व इतर नूतनीकरण कामासाठी तब्बल ३ कोटी ६६ लक्ष ५६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नामुळे मंजूर झालेल्या निधीतून रेणापूर पंचायत समितीच्या इमारतीला निश्चितपणे नवी झळाळी मिळणार असून ग्रामीण भागातील गावागावातून वाडी वस्तीतून येणाऱ्या लोकप्रतिनिधी बरोबरच सर्वसामान्य नागरिकांना सोई सुविधा मिळण्यास मोठी मदत होणार असून सदरील निधी मिळवून दिल्याबद्दल भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, माजी जिप सभापती सौ. संगिता घुले, पंचायत समिती माजी सभापती सौ. अयोध्या आंबेकर, माजी उपसभापती अनंत चव्हाण यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## आ. धिरज विलासराव देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश विविध विकास कामांसाठी १ कोटी ६८ लाख रुपयांचा निधी मंजूर

लातूर/प्रतिनिधी :- आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले असून, लातूर ग्रामीण मतदारसंघाकरिता सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२४ -२५ योजनेअंतर्गत १ कोटी ६८ लाख रुपयांचा विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. लातूर ग्रामीण मतदारसंघातील रेणापूर, औसा व लातूर तालुक्यातील विविध गावांतील विकास कामांसाठी हा निधी वापरण्यात येणार आहे. यात गावांतर्गत सिमेंट रस्ता, स्मशानभूमी शेड उभारणे, पेव्हर ब्लॉक रस्ता बनवणे अशा प्रकारच्या कामांचा समावेश आहे. यामध्ये मतदारसंघातील सोनवती, सारोळा, शिवली, व्हटी २, रामेश्वर, मुशिराबाद, मुरुड अकोला, मुरढव, मसला, वाघोली, ब्रह्मवाडी,



पोहरेगाव, पळशी, निवाडा, नागापूर, धनेगाव, टेंबी, जायफळ, चिंचोलीराव वाडी, गाधवड, कोळपा, कामखेडा, उटी खु., असराचीवाडी या गावांचा समावेश आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी महोदयांकडून सोमवार दि.(३०) सप्टेंबर रोजी निधी वितरण आदेश जारी करण्यात आला आहे. लातूर ग्रामीण मधील विविध विकास कामे आपणास मार्गी लावता येत असल्याचे समाधान असल्याच्या भावना व्यक्त करून आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पालकमंत्री महोदय व जिल्हाधिकारी यांनी निधी मंजूर केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## गांधी जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने पत्रकाराना बॅगचे वाटप





रेणापूर/ प्रतिनिधी :- महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शाखा रेनापुर च्या वतीने तालुक्यातील पत्रकाराना बॅगचे वाटप करण्यात आले. गांधी जयंती तसेच लालबहादूर शात्री यांच्या पुण्यतिथी निम्मित त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, व्हाईस मीडियातील तालुक्यातील पत्रकारांना बॅगचे वाटप महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे,सचिव अशोक हनवते,समनक जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष जयसिंग जाधव आदी मान्यवराच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी नायक संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे तालुकाध्यक्ष शरद राठोड,सुधाकर फुले,व्हाईस मिडीयाचे सिद्धार्थ चव्हाण,रफिक शिकलकर, वाल्मिक केंद्रे,अनिल फुलारी,संतोष तुरूप,तुकाराम जोगदंड,संजय माकेगावकर गोपाळ चिताडे,ईश्वर बद्धर, श्याम पाठक, वसंत सूर्यवंशी आदी पत्रकार बांधवाची उपस्थिती होती.

## युवा उद्योजक बाळासाहेब पाटोदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात प्रवेश

उदगीर : येथील युवा उद्योजक बाळासाहेब शंकरराव पाटोदे यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात पक्षाचे नेते राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे. यावेळी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष बालाजी भोसले दावणगाव सोसायटीचे व्हाईस चेअरमन धनाजी मुळे आदीसह प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना बाळासाहेब पाटोदे यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी ना.संजय बनसोडे यांनी दिवस-रात्र प्रयत्न करत असुन त्यांच्या खांद्याला खांदा लावून या



विकास कार्यात सहभागी होण्यासाठी आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याचे सांगितले. मी ठेकेदारी करण्यासाठी किंवा आर्थिक लाभ घेण्यासाठी प्रवेश केला नसून ना. संजय बनसोडे यांचेसारखे नेते मतदार संघाचे विकासासाठी रात्रंदिवस धडपडत आहेत अनेक प्रलंबित असलेले विकासाचे प्रश्न पूर्ण करण्यासाठी ना. बनसोडे यांनाच आपण साथ दिली पाहिजे यासाठी मी प्रवेश करीत असल्याचे सांगितले.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी मी तुमच्या पाठीशी आहे. मतदारसंघातील ज्या काही अडचणी आहेत त्या सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करा. ना.संजय बनसोडे यांना साथ द्या असे म्हणून आशिर्वादाची थाप मारली. शासकीय विश्रामगृह उदगीर येथील या प्रवेश सोहळ्यावेळी अनेक मान्यवर कार्यकर्ते व नेते उपस्थित होते.

## दिलीपराव देशमुख यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रधान

लातूर- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना मानाचा सहकारमहर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ नुकताच प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या मान्यवरांना मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात येत असतो. यावर्षी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर रोजी हा सोहळा लातूर येथील दयानंद सभागृहात ह. भ.प. गहिनीनाथ महाराज, खा. डॉ. शिवाजी काळगे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे,राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे दिल्ली, जेष्टपत्रकार जयप्रकाश दगडे, मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी,जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते ,प्रा. विठ्ठल कांगणे आदींच्या उपस्थितीत पार पडला. परंतु याच दिवशी पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी माजी मंत्री दिलीपराव देशमुख बाहेरगावी गेले



होते. त्यांनी केलेल्या सहकारातील कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने त्यांची यावर्षीच्या मानाचा सहकार महर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ साठी निवड केली असल्याने त्यांना आशियाना बंगल्यावर जाऊन जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते व जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रा.यु.डी. गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी,शहराध्यक्ष महादेव डोंबे यांनी त्यांना सन्मानित केले.

## घटस्थापनेसाठी लागणा-या साहित्यांच्या खरेदीसाठी गर्दी

लातूर : सिध्देश्वर दाताळ आजपासून नवरात्र उत्सवाला सुरूवात झाली असून बाजारात सध्या माती, पुजेच्या साहित्यांची विक्री केली जात आहे. मातेचा जागर करण्यासाठी लागणा-या पूजेच्या साहित्यानी बाजार सजला आहे. साहित्यांची खरेदी करण्यासाठी भक्तगणांची बाजारात लगबग सुरु झाली आहे. घट स्थापनेसाठी लागणारे मातीचे लोटके सध्या बाजारात उपलब्ध झाले असून ग्राहकांचीदेखील मातीसह साहित्य खरेदी करीत आहेत. दुर्गा माता देवीच्या आगमनाची तयारी, गरब्याची धूम अशा अनेक गोष्टींची तयारी जोरदार झाली आहे. आज नवरात्रीनिमित्ताने दुर्गा मातेचे घरोघरी घटस्थापना उत्साहात होणार आहे. त्यासाठी घट बसविण्यासाठी मातीसह पुजेच्या साहित्याची गरज लागते. ही गरज लक्षात घेऊन शहरातील किरकोळ बाजारात काही व्यापा-यांनी विविध साहित्य विक्रीसाठी ठेवले आहेत. त्या साहित्याची विक्री मोठ्या प्रमाणात केली जात आहे. बाजारात सध्या १० रुपयात लोटकं भर माती, पुजेचे साहित्य ३० ते ४० रूपयांत विकली जात असून शहरातील नागरीक मोठ्या उत्साहात साहित्य खरेदी करीत असल्याचे दिसून येत आहे. या दिवसात मातेचा जागर करण्यासाठी लागणा-या पूजेच्या साहित्यांनी बाजार सजला आहेत. साहित्याची खरेदी करण्यासाठी भक्तगणांची बाजारात लगबग सुरू झाली आहे. घटाला लागणा-या साहित्य, फळे, फुले, केळीची पाने, सुपारी, हळद कुंकू, कडधान्य त्याच बरोबर घटस्थापनेसाठी मातीचे घट आणि माती लागते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात अनेक मान्यवरांचा पक्ष प्रवेश

उदगीर : राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या व क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून उदगीर शहर व तालुक्यातून विविध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ यांच्या पुढाकारातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या सर्व कार्यकर्त्यांना पक्षांमध्ये प्रवेश देऊन पक्षाची ध्येय धोरणे सर्वसामान्य घटकापर्यंत पोहचवण्याचे काम करावे अशा सूचना दिल्या. यावेळी कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार



विक्रम काळे, आमदार बाबासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अफसर शेख, ॲड. व्यंकट बेद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) वंचित बहूजन आघाडी वंचित बहूजन आघाडीचे शहराध्यक्ष मझहर पटेल, शरदचंद्र पवार गटाचे अल्पसंख्याक शहर अध्यक्ष शेख महेबुब निजामुद्दीन, महेश तोडकर, संदीप देशमुख बबलू मुळे, बंटी आलमकेरे, सचिन आठाणे, इस्माईल शेख लोणीकर (अटो यूनीयन तालुका अध्यक्ष), जावेद मुंजेवार, मगदुम मुंजेवार,ॲड युसुफ शेख, फेरोज पठान,रत्नदिप सोमवंशी,गूलाम शेख,साजीद पटेल, आदींनी पक्ष प्रवेश केला.

## संपादकीय....

# गांधीजींचे मूल्यशिक्षण

देशाची प्रगती साधायची असेल तर त्या प्रगतीचा आत्मा म्हणजे शिक्षण होय, अशा विचारातून महात्मा गांधी यांची शिक्षणाबद्दलची आस्था स्पष्ट होते. आज त्यांची जयंती.आपले विचार व कार्यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेणारा युगपुरुष म्हणजे महात्मा गांधीजी. स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, तत्त्वचिंतक व शिक्षणतज्ज्ञ अशा विविध जबाबदार्या पेलताना त्यांचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट होतात. विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण मोफत, सक्तीने व मातृभाषेतूनच दिले जावे, असा गांधीजींचा आग्रह होता. प्रचलित शिक्षणाबरोबरच शारीरिक श्रम आणि प्रशिक्षण याचाही अंतर्भाव शिक्षणात असणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे त्यांचे मत होते. विणकाम, सुतकताई, शेती, मातीकाम, हस्तकला, बागकाम, पुस्तक बांधणी या कृतीशील उपक्रमाला त्यांनी महत्त्व दिले. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांची अर्थार्जनाची क्षमता विकसित केली पाहिजे. ‘स्वच्छता’ हा शिक्षणातील महत्त्वाचा घटक आहे.

शरीर स्वच्छता, शाळेची स्वच्छता, परिसराची स्वच्छता यांचा अभ्यासक्रमात समावेश असलाच पाहिजे यावर गांधीजी ठाम होते. श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी आश्रमातील शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना काही कष्टाची कामे करावी लागत असत, हा गांधीजींच्या मूल्यशिक्षणाचा एक भाग होता. गांधीजी स्वतः शारीरिक कष्टाची कामे करीत असत. त्यांनी स्वतः च्या आयुष्यात शारीरिक श्रमाला महत्त्व दिले होते परिणामी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत असे. काम हे काम असून कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते. विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व त्यांनी कृतीतून दाखवून दिले. गांधीजींनी नैतिकता व प्रामाणिकपणाला शिक्षणाचा महत्त्वाचा भाग मानला. विद्यार्थ्यांना आवडतील अशा उपक्रमांचा समावेशही अभ्यासक्रमामध्ये त्यांनी मुद्दामहून केला होता. जेणेकरून शिक्षण हसत खेळत व आनंददायी प्रक्रिया व्हावी.

शिक्षणातून विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबर स्वावलंबन आणि उपजीविकेसाठी लागणार्या क्षमता व कला प्राप्त केल्या पाहिजेत, याविषयी गांधीजींची तळमळ होती. शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत असलेल्या सर्वोत्तम गुणांचा विकास गांधीजींना अपेक्षित होता. समाजाने विहित केलेले कायदे आणि नियमांचे पालन करण्यासाठी स्वयंशिस्त महत्त्वाची असून विद्यार्थ्यांना शिस्त बाहेरून लादू नये, असे गांधीजींचे मत होते. विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची जडणघडण व्हावी. सदाचार, संयम, सहिष्णुता, आत्मनिर्भरता, सत्याग्रह अशा गुणांची जोपासना शिक्षणाच्या माध्यमातून झाली तर विद्यार्थ्यांच्या अपेक्षित व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होईल, यावर गांधीजींचा विश्वास होता. शिक्षणातून विद्यार्थ्यांचा मानसिक, भावनिक, बौद्धिक व शारीरिक विकास साधला पाहिजे. विद्यार्थ्याला दिले जाणारे शिक्षण त्याच्या सामाजिक वातावरणास पोषक असले पाहिजे. त्यातून विद्यार्थ्याला सामाजिक जाणिवेचे भान आले पाहिजे. शिक्षणातून भारतीय संस्कृती जोपासली जावी, असे गांधीजींना वाटत होते.

शिक्षणात विद्यार्थ्यांच्या कृतीला वाव असावा. शारीरिक अवयवांच्या माध्यमातून बौद्धिक शिक्षणावर भर दिला जावा. गांधीजींनी शिक्षणात स्वानुभवाला महत्त्वाचे स्थान दिले होते. जेवढा जास्त अनुभव विद्यार्थ्यांना घेता येईल तेवढे त्यांचे ज्ञान व्यापक होईल. अनुभवातून शिकण्याची संधी सर्व विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे यावर ते ठाम होते.

महात्मा गांधीजींनी वर्ष १९११ पासून भारतात व भारताबाहेर अनेक शैक्षणिक प्रयोग सुरू केले. या प्रयोगातून त्यांची स्वतः ची शिक्षण पद्धती निर्माण झाली. मूलोद्योगी शिक्षण, बुनियादी शिक्षण, वर्धा शिक्षण, जीवन शिक्षण अशा नावांनी त्या ओळखल्या जातात. याचे प्रयोग त्यांनी साबरमती आश्रम, शांतिनिकेतन, टॉलस्टॉय फार्म अशा ठिकाणी केले. शिक्षणाला श्रमाची जोड घालून कृतिशील शिक्षण दिले जावे असा त्यांचा विचार होता. परस्परांशी सहकार्य वृत्ती, संयम, सहनशीलता, आदर्श सृजनशीलता, उद्योजकता, सामाजिक जबाबदारी ही कौशल्ये शिक्षणातून विकसित झाली पाहिजेत. विद्यार्थ्यांची सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन अध्यापनाची प्रक्रिया पार पाडली जावी परिणामी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सामाजिक आणि भावनिक कौशल्य विकसित होईल याची गांधीजींना खात्री होती.

शिक्षण आत्मविश्वास वाढवायला मदत करते त्यामुळे मुलांबरोबर प्रौढांनाही साक्षर केले पाहिजे, असे गांधीजींचे मत होते. प्रौढ शिक्षणामुळे प्रौढ स्वावलंबी बनतील. त्यांच्या जीवनातील अडचणी सोडवणे शिक्षणामुळे सोपे होईल. प्रौढ शिक्षण हे अक्षर ओळखीपर्यंत मर्यादित असू नये, त्यातून अपेक्षित व्यवहारी ज्ञान मिळाले पाहिजे यावर गांधीजींचा कटाक्ष होता. पुरुषाबरोबर स्त्रियांनाही शिक्षणाची तितकीच गरज आहे. त्यांनाही पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाली तर समाजाच्या विकासाला गती मिळेल यावर गांधीजींचा विश्वास होता. शिक्षण हे विद्यार्थीकेंद्रित असावे. विद्यार्थ्यांमधील कला, सुप्तगुण यांना चालना दिली जावी. विद्यार्थ्यांची आवड, निवड, कल व रुची याचा विचार करून त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. विद्यार्थ्यांचा फक्त गुणांचा आकडा मोठा होऊन चालणार नाही तर त्यांचे चारित्र्य घडवले जावे.

‘शिक्षक हे विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तक असावेत’ हा गांधीजींचा विचार म्हणजे शिक्षकांची कर्तव्ये काय असावीत, शिक्षक कसा असावा हे स्पष्ट करणारा आहे. शाळेत विद्यार्थ्यांचे पालक शिक्षकच असतात तेव्हा फक्त पाठ्यपुस्तक शिकवणे हा हेतू नसावा. त्याच्या बाहेर जाऊन आदर्श मूल्ये मुलांमध्ये रुजवावी हे गांधीजींना अपेक्षित होते. प्रत्येक विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन त्याला योग्य न्याय शिक्षकाकडून मिळायला हवा. विद्यार्थी चुकत-चुकत शिकत असतात त्यामुळे विद्यार्थ्यांना गैरवर्तन केल्यास शारीरिक शिक्षा देणे चुकीचे आहे. विद्यार्थ्यांना सुधारण्याच्या अनेक पद्धती त्यांनी स्वतः शोधून काढल्या. विद्यार्थी गैरवर्तन करतात यात त्यांनी शिक्षकांना दोषी मानले. शिक्षकांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे, असे गांधींचे मत होते. आजचे विद्यार्थी उद्याचे देशाचे नागरिक आहेत त्यामुळे त्यांनी जबाबदारीने वागले पाहिजे. आपल्या देशात आदर्शांची कमी नाही. विद्यार्थ्यांनी त्यांचे आदर्श स्वतः निवडून चांगले गुण आचरणात आणावेत. जात-धर्म, अस्पृश्यता, भेदाभेद मानू नये. विद्यार्थ्यांनी सहकार्याची वृत्ती ठेवावी. रुग्णांची सेवा करावी. शिक्षणाचा प्रसार करावा. स्वच्छता ठेवावी. समाजोपयोगी कामात अग्रेसर राहावे. नवीन ज्ञान मिळवत राहून मिळवलेल्या ज्ञानाचा वापर फक्त स्वतःसाठी न करता समाजासाठी करावा. अहिंसेचे पालन करावे. प्रत्येकाचा आदर करावा. व्यसनापासून स्वतः ला दूर ठेवावे. अशी विद्यार्थ्यांची कर्तव्ये गांधीजींनी सांगितले आहेत. आज वाढलेली बेरोजगारी पाहता शिक्षण कार्याभिमुख असले पाहिजे हा गांधीजींचा विचार किती काळानुरूप आहे हे पटते. २०२०च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणाच्या व्यावसायिकीकरणाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे, तेव्हा गांधीजींचे शैक्षणिक विचार आजही किती काळसुसंगत आहेत याचा प्रत्यय येतो. आज गांधीजींच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या विचारांचा वारसा आपण जपला तर समाजाच्या पर्यायाने देशाच्या प्रगतीत हातभार लागेल, यात दुमत असण्याचे कारण नाही.

# नकारात्मक संदेश



देशाच्या अर्थव्यवस्थेच्या संबंधात राज्यकर्त्यांकडून सातत्याने गुलाबी चित्र रंगवले जात आहे. सत्ताधार्यांचे ते कामच असते; पण प्रत्यक्षातली वस्तुस्थिती मात्र वेगळी असते. मधला काही काळ अर्थव्यवस्थेसाठी जरा बरा गेल्यानंतर, पुन्हा या संदर्भातील जी माहिती उपलब्ध होत आहे ती फारशी उत्साहवर्धक नाही. किंबहुना त्यातून नकारात्मक संदेशच मिळत आहेत. देशाची वित्तीय तूट एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत ४ लाख ३५ हजार कोटी रुपयांवर गेली आहे. यावर्षी वित्तीय तुटीचा जो अंदाज वर्तवला गेला होता त्या अंदाजाच्या तुलनेत हे प्रमाण २७ टक्के इतके आहे. ही सरकारनेच जाहीर केलेली अधिकृत आकडेवारी आहे. सरकारने चालू आर्थिक वर्षात वित्तीय तुटीचे उद्दिष्ट एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.९ टक्के इतके ठेवले आहे, पण त्या मर्यादेत ही वित्तीय तूट राहील की नाही याची शंका आता निर्माण होत आहे. गेल्या आर्थिक वर्षात हे तुटीचे प्रमाण ५.६ टक्के इतके होते. यंदा कदाचित त्याच्याही वर ते जाऊ शकते, हे प्रमाण चिंताजनक आहे. याच पार्श्वभूमीवर चालू खात्यातील तूट ही ९.७ अब्ज डॉलरवर गेली आहे. ही तूट एकूण जीडीपीच्या एक टक्क्याहून अधिक आहे. चालू खात्यावरील तुटीचे प्रमाण हे सेवाक्षेत्र, व्यापारी मालाची निर्यात आदी बाबींवर अवलंबून असते. संगणक सेवा, व्यावसायिक सेवा यासारख्या सेवा क्षेत्राच्या निर्यातीच्या आधारावर चालू खात्यातील तुटीचे प्रमाण अवलंबून असते. सारासार विचार करता निर्यात घटतानाच दिसत आहे. हे सगळे होत असतानाच तिकडे पायाभूत क्षेत्रांच्या वाढीतही ऑगस्ट महिन्यात घसरण नोंदवली गेली. प्रसिद्ध झालेली आकडेवारी असे सांगते की, साडेतीन वर्षांनंतर प्रथमच, पायाभूत क्षेत्रांच्या उत्पादनात घट नोंदवली गेली आहे. काल शेअर बाजारही १२७२ अंकांनी गडगडला. अर्थात, शेअर बाजाराचे गडगडणे किंवा वधारणे हे थेट देशाच्या अर्थकारणाशी निगडित नसले, तरी त्यातून काही संकेत निश्चित उपलब्ध होत असतात. शेअरबाजार गडगडला असला तरी त्यातल्या त्यात एक चांगली बातमी अशी की, विदेशी गुंतवणूकदारांनी सप्टेंबर महिन्यात देशातील शेअर बाजारात सुमारे ५८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. हे विदेशी गुंतवणूकदार आर्थिक तेजी-मंदीचा रोख पटकन ओळखून असतात. त्यामुळे ते कधी अचानक गुंतवणूक वाढवतात, तर कधी अचानक मोठ्या प्रमाणात काढूनही घेतात. एकूणच सारासार विचार केला तर देशाच्या अर्थकारणासाठी फार पॉझिटिव्ह म्हणता येतील, असे निष्कर्ष निदर्शनाला येत नाहीत. सरकार देशाच्या नेमक्या आर्थिक स्थितीबाबत जनतेला नेमकेपणाने माहिती देत नाही ही गेल्या अनेक वर्षांपासूनची ओरड आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना प्रश्न विचारलेले आवडत नाहीत. सरकारच्या धोरणांविषयी खुलासा मागितलेला त्यांना आवडत नाही, त्यांच्यापुढे अडचणीचा पाढा वाचणे हेसुद्धा धोकादायक असते. कारण त्या लगेच संतापी प्रतिक्रिया नोंदवतात. त्या अर्थकारणाच्या स्थितीबाबत माहिती देण्याऐवजी दुसर्याच कुठल्यातरी सबबी पुढे करून सविस्तर बोलणे टाळणे पसंत करीत असतात, हा अनुभव आपल्याला खूप काळापासून आहे. देशाच्या आर्थिक स्थितीबाबत विरोधी पक्षांकडून विशेषतः काँग्रेसकडून सातत्याने जी माहिती विचारली जात आहे त्याच्यावर सरकार खुलासा करताना दिसत नाही. लोकांची क्रयशक्ती कमी होत आहे, बँकांमधील बचत कमी होत आहे, रोजगाराची बोंबाबोंब आहे, या सगळ्या संबंधातील आकडेवारी वेळोवेळी लोकांपुढे आणून सरकारला जाब विचारले गेले आहेत. पण यातील कोणत्याच मुद्द्याला सरकारकडून उत्तरे मिळताना दिसत नाही.

अशातच केंद्रातील एक प्रभावी मंत्री असलेले नितीन गडकरी यांनीच आता खुलेपणाने बोलून सरकारचे कान टोचण्याचे काम हाती घेतले आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे लागेल. गुंतवणूकदारांनी सरकारवर अवलंबून राहू नये, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे. ‘सरकार म्हणजे विषकन्या असते. ती ज्यांच्या बरोबर असते त्यांचे ती वाटोळेच करते’ असे जळजळीत निरीक्षणही त्यांनी नोंदवले आहे. महाराष्ट्रात ‘लाडकी बहीण’ योजनेसारख्या योजनेवर जो अफाट खर्च होत आहे त्यातून सरकारकडे योजनांना द्यायला पैसा उरत नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. गडकरी साहेबांची ही स्पष्टोक्ती कौतुकास्पद आहे. त्यामागे कोणतेही राजकीय संदर्भ चिटकवण्याची गरज नाही. कोणीतरी या सगळ्या बाबी लोकांपुढे मांडणे गरजेचे आहे.

ती भूमिका सध्या गडकरी निभावताना दिसतात. वस्तुतः अर्थमंत्री या नात्याने निर्मला सीतारामन यांनी किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या अर्थकारणाबाबत जनतेला वेळोवेळी विश्वासात घेणे गरजेचे असताना ते मात्र ही जबाबदारी पार पाडताना दिसत नाहीत. निवडणूक प्रचार दौर्यांमध्ये विरोधकांवर तोंडसुख घेताना त्यांची वाणी स्वैरपणे चालते, पण याच वाणीतून देशापुढील समस्या आणि अडचणींबाबतची माहिती ते लोकांना जेव्हा नेमकेपणाने देतील तो सुदिन म्हणावा लागेल. मुद्दा एवढाच आहे की, सरकारने लपवाछपवी करायचा प्रयत्न केला तरी आर्थिक इंडिकेटर या ना त्या मार्गाने लोकांपुढे येतच राहतात. त्यातून लोकांना जे निराशेचे संकेत मिळतात त्याविषयी अधिकृत भूमिका स्पष्ट करणे ही जबाबदारी आता सरकारने स्वीकारायला हवी. महत्त्वाचे मुद्दे चर्चेतून कसे गायब करायचे याचे कसब सरकारने चांगलेच आत्मसात केले आहे. प्रसारमाध्यमांमधूनही हे मुद्दे कसे गायब करायचे याचे तंत्रही सरकार जाणून आहे. पण तसे केल्याने मूळ समस्या मात्र तशीच राहते किंबहुना ती भविष्यकाळात उग्र स्वरूप धारण करते. त्यातून पुढे मोठी आव्हानात्मक स्थिती निर्माण होऊ शकते हे लक्षात घ्यावे लागेल. हे टाळायचे असेल तर सरकारने लोकांना विश्वासात घेणे अधिक देश हिताचे ठरेल.

# विचारांच्या लाटेवर स्वार झालेला भीमसैनिक स्तंभ लेखक

निर्भीड निर्भय निपक्षपाती पत्रकार साहित्यिक आणि कामगार नेते म्हणून आयु सागर रामभाऊ तायडे हे आंबेडकरी चळवळीतील सर्वांच्याच परिचयाचे नांव !. मागील सहा दशकांपासून सागर तायडे यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केले असून, महाराष्ट्रातील सुमारे साठहून अधिक वृत्तपत्रे,साप्ताहिक,मासिकांमधून सातत्याने त्यांचे लेखनकार्य सुरू आहे.असे असले तरी सागर रामभाऊ तायडे यांचे कामगार चळवळीशी असलेले अतूट नाते होय. कामगारांच्या प्रश्नावर सातत्याने लिहिणारे,व कामगारांशी नाळ जपणारे नेते अशी ओळख असलेले सागर तायडे यांनी असंघटित कामगार नाका कामगार,घरेलू कामगारांपासून ते विविध क्षेत्रातील कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न कायमस्वरूपी सुरू असतो. त्याच बरोबर प्रशासनातील कामगार,कर्मचारी अधिकारी वर्गांच्या समस्यांवर विपुल लेखन केले आहे. कामगार मेळावे,परिषदांच्या निमित्ताने अनेक राज्यातील कामगारांच्या समस्या जवळून पाहता आल्या आणि त्यातूनच कामगारांच्या हक्क आणि अधिकारांच्या लढाईसाठी लेखणी सरसावली. कधीकाळी महाराष्ट्र टाईम्स,लोकसत्ता यांसारख्या भांडवलधारी वृत्तपत्रांतून लिहिणारे सागर तायडेची ओळख बहुजनवादी चेहरा अशी झाली.प्रामुख्याने कोल्हापूरहून प्रसिद्ध होत असलेल्या दैनिक मुक्तनायक या वृत्तपत्राचे ते स्तंभलेखक असून, मुक्तसागर लाटा या सदरात ते सातत्याने लिहित असतात. विविध वृत्तपत्रांत त्यांचे स्तंभ लेखन नियमितपणे सुरू आहे.

सागर तायडे सागर लाटांवर नुसते स्वार होऊन थांबले नाहीत,तर समुद्राच्या तळाशी जाऊन शोध घेणाऱ्या पाणबुड्याच्या भूमिकेतून सामाजिक प्रश्नांकडे पाहतात.अर्थात तळालगतच्या ऐकू येणार्या गाजेचे रूपांतर लेखणी होते,जे आशयासह संवेदनवादी प्रणालीचा पुरस्कार करू पाहते! केवळ लढे,आंदोलनापुरते संघटन न करता,सर्व थरातील कामगारांना शासकीय अनुदाने कल्याणकारी योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे सागर तायडे कामगारांना संविधानाचे महत्व ही पटवून देतात. नागरीक म्हणून अधिकार असलाच पाहिजे पण कर्तव्याची जाणीव करून देण्यास ते विसरत नाहीत. एकूणच सागर तायडे हे सामाजिक,स्तरावर वावरत असताना साक्षेपी भान असलेल्या समीक्षकाच्या चष्म्यातून पाहतात त्यामुळेच त्याचे लेखन लोकांच्या आदरास पात्र ठरते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाढलेले सागर तायडे यांच्यावर महामानवांच्या विचारांचा असलेला प्रभाव त्यांचे लेख वाचल्यावर लक्षात येते.विशेषतः भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कार्याचा तायडे यांच्यावर चांगलाच प्रभाव असल्याचे जाणवते.म्हणूनच ते सत्यशोधक कामगार संघटनेचे संस्थापक सदस्य आहेत.आज ते राज्य अध्यक्ष म्हणून नाका कामगारांसाठी संघर्ष करत आहेत. त्याचा प्रमाणे ते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील स्वतंत्र मजदूर युनियन चे राज्य अध्यक्ष म्हणून जबाबदारी पर पडत आहेत.



दैनिक विश्वपथ या दैनिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांचा सागर लाटा हा लेख संग्रह माझ्या प्रस्तावनेने प्रसिद्ध झाला असून,कामगार चळवळीबरोबरच बहुजनांच्या उत्थानाकडे वाटचाल करणारे त्यांचे पुस्तक या अर्थाने मी क्रांतिकारी विचारांच्या सागर लाटा या पुस्तकाकडे पाहतो. स्वभूमिकेशी प्रतारणा न करता, किंबहुना तडजोडवादी विचारप्रणालीशी गळाभेटीच्या फंदात न अडकता भारतीय संविधानाने बहाल केलेल्या व्यक्ती स्वातंत्र्याची जपणूक करणारे सागर तायडेंमधला लेखक महाराष्ट्राच्या मातीने पाहिला! आज त्यांच्या अथक परिश्रमातून साकार झालेले साहित्याच्या रूपाने पहिले अपत्य वाचकांपुढे आले तेव्हा त्याचे स्वागत उत्सपूर्त पणे झाले होते. ते परिवर्तनवादी चळवळीला नवा आयाम देणारे ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करून सागर तायडे यांच्या त्यांच्या ६३ व्या जन्मदिनानिमित्त त्यांचे हार्दिक मंगल कामना व्यक्त करतो आणि पुढील वाटचालीस अनंत सदिच्छा !

*************

गुणाजी काजिर्डेकर, ९३२३६३२३२०चेंबूर मुंबई
आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ पत्रकार

# फुले आंबेडकरांचा जातीअंताचा विचार...!

महात्मा फुले यांना डॉ.आंबेडकर आपले गुरू मानत होते. महात्मा फुले १८२३ साली जन्मले तर डॉ.आंबेडकर १८८९ मध्ये. त्यांच्यात तब्बल ६६ वर्षांचे अंतर होते. फुले कालवश झाले तेव्हा बाबासाहेब तीन वर्षांचे होते. या दोन्ही महामानवांच्या विचारांची झेप फार मोठी होती. समाजपरिवर्तन का आणि कशासाठी करायचे याबाबतच्या त्यांच्या भूमिका पक्क्या होत्या. आज समाजामध्ये जातजाणिवा पातळ होण्याऐवजी बळकट होताना दिसत आहेत. जाती व धर्माच्या प्रश्नांना जगण्याच्या प्रश्नांपेक्षा महत्त्वाचे ठरवत त्यावर आधारित राजकारण केले जात आहे. हे आमच्या पुरोगामीपणाचे खचितच लक्षण नाही. म्हणूनच या दोन महामानवांनी जातिअंता बाबतची जी भूमिका मांडलेली आहे ती ध्यानात घेणे आणि तिचा अंगीकार करणे ही काळाची गरज आहे. इंग्रजी सत्ता, दारिद्र्य, रोगराई, दुष्काळ, सावकारी फास, गुलामगिरी, शेतकऱ्यांची होरपळ आदी कारणांनी पिचत चाललेल्या समाजाला महात्मा फुले यांनी सर्वप्रथम शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा कृतिशील प्रयत्न केला. शिक्षणापासून ते लेखनापर्यंतच्या आणि स्त्री मुक्तीपासून ते सत्यशोधक समाजापर्यंतच्या अनेक क्षेत्रांत फुल्यांनी उत्तुंग कामगिरी केली. आज राजकारणापासून कलेपर्यंतची सर्व क्षेत्रे आज जात्यंध व धर्मांध विचारांनी प्रदूषित केली जात, आपण जातिअंतासाठी त्यांनी केलेल्या कामाचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. महात्मा फुले यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीतींविरोधात आवाज उठवला. जातिव्यवस्थेवर प्रहार केला. त्यांनी पुनर्विवाहाला दिलेल्या प्रोत्साहनापासून विधवांच्या संततीच्या बालकाश्रमापर्यंतचे केलेले उपक्रम ही जातिअंतासाठीची महत्त्वाची पावले मानावी लागतील. तुकाराम तात्या पडवळ यांच्या जातिभेद विवेकसार या पुस्तकाची महात्मा फुलेंनी दुसरी आवृत्ती स्वत: काढली होती. मी कोणत्याही व्यक्तीच्या हातचे अन्नग्रहण करेन, असे म्हणणाऱ्या व तसे वागणाऱ्या महात्मा फुलेंनी अस्पृश्यांसाठी स्वत:च्या वापरातील पाण्याचा हौद खुला केला होता. विधवांच्या केशवपनाविरोधात आवाज उठवला होता. तसेच वैचारिक दास्यातून समाजाची सोडवणूक व्हावी म्हणून गुलामगिरी सारखा ग्रंथ त्यांनी लिहिला. तसेच समतेचा विचार देणाऱ्या सत्यशोधक समाजाची भूमिका त्यांनी मांडली. हे जग निर्माण करणारा कोणीतरी निर्मिक मानता येईल, परंतु कोणताही धर्म अथवा धर्मग्रंथ ईश्वराने निर्माण केला नाही. इथला जातिभेद, वर्णव्यवस्था ही तर माणसाने स्वार्थी हेतूने निर्माण केली आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. सार्वजनिक सत्यधर्म हे पुस्तक फुले यांच्या निधनानंतर प्रकाशित झाले. त्यात त्यांची मूलगामी तत्त्वधारा दिसते. ख्यातनाम चरित्रकार धनंजय कीर यांनी या पुस्तकाला विश्व कुटुंबवादाची गाथा म्हटले आहे. सर्व प्रकारची विषमता ही मानव निर्मित आहे म्हणून ती आपणच नष्ट केली पाहिजे. व समता प्रस्थापित करण्यात पुढाकार घेतला पाहिजे, ही त्यांची तळमळ फार महत्त्वाची होती. जातिव्यवस्थेचा दाहकपणा समाजाचे स्वास्थ्य घालवतो, त्यामुळे जातिअंताची भूमिका महात्मा फुले अग्रक्रमाने मांडत राहिले . हीच भूमिका त्यांचे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांनी अधिक अभ्यासपूर्ण आणि तपशीलवार पद्धतीने मांडलेली आहे. डॉ.आंबेडकर हे प्रखर बुद्धिवादी विचारवंत होते. या महामानवाने देशातील कोट्यवधी जनतेच्या मनात स्वाभिमान जागृत केला. शतकानुशतके उपेक्षित राहिलेल्या समाजात त्यांनी वैचारिक जागृती घडवून आणली. सामाजिक समतेचे आंदोलन प्राणपणाने लढणाऱ्या डॉ. बाबासाहेबांचे राजकीय व शैक्षणिक कार्य अतिशय व्यापक स्वरूपाचे आहे. स्वतंत्र भारताला आदर्श राज्यघटना देण्यामध्ये त्यांचे योगदान फार मोठे आहे, अग्रक्रमाचे आहे. आज स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव झाला, राज्यघटनेचा अमृत महोत्सव सुरू असताना समाजाची वाटचाल जातिअंताऐवजी



जातीच्या सक्षमीकरणाकडे होताना दिसत आहे. आपली राजकीय दुकानदारी चालू ठेवण्यासाठी काही पक्ष, संघटना जात जाणीवा बळकट करण्याची नियोजनबद्ध कारस्थाने रचत आहेत. त्यासाठी समाजाला वेठीला धरले जात आहे. हे सारे सामाजिकदृष्ट्या अतिशय हानिकारक आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांचे जातीसंस्थेचे विश्लेषण आणि जातिसंस्था नष्ट करण्याचे मार्ग आपण समजून घेतले पाहिजेत. १९१६ साली डॉ. आंबेडकरांनी भारतातील जातिसंस्था, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास हा लेख लिहून जातीसंस्थेचे विश्लेषण मांडले. जातिसंस्था ही मानवनिर्मित- म्हणून कृत्रिम आहे. जातीबद्ध विवाहसंस्था हा तिचा मुख्य आधार आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. अनुकरणाचा संसर्गदोष हा सिद्धांत त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी मांडला आहे. त्यांच्या मते, जगातील सर्व समाज हे वर्गीय समाज होते. त्या वर्गाचा आधार आर्थिक, बौद्धिक किंवा सामाजिक होता. समाजातील व्यक्ती नेहमीच कोणत्या ना कोणत्या तरी वर्गाची घटक असते; ही जागतिक वस्तुस्थिती असल्याने हिंदू समाजही त्याला अपवाद नव्हता. भारत सोडून अन्यत्र समाजातील वर्ग मुक्त राहिल्याने ते समाज परिवर्तनीय राहिले. परंतु भारतातील वर्ग बंदिस्त केले गेल्यामुळे भारतात जाती निर्माण झाल्या. जात म्हणजे बंदिस्त वर्ग. भारतीय समाजात वर्गाला बंदिस्त करण्याची प्रक्रिया तत्कालीन उच्चवर्णीयांनी सुरू केली. त्याचे अनुकरण इतर खालच्या वर्णांनीही केले. डॉ.आंबेडकर म्हणतात : जातिसंस्था ही मनूने निर्माण केलेली नसून ती त्याच्यापूर्वी फार वर्षे अस्तित्वात होती. मनू हा केवळ जातिव्यवस्थेला तात्त्विक रूप देणारा तिचा प्रचारक होता. जातिव्यवस्था ही उपदेशातून निर्माण झालेली नाही. आणि उपदेशातून ती नष्टही होणार नाही. हे स्पष्टपणे सांगून आंबेडकरांनी जातिसंस्थेच्या उत्पत्तीत केंद्रबिंदू असलेल्या व्यवसाय, वर्गीय संस्था, नव्या श्रद्धा, देशांतर आदी मुद्द्यांकडेही ॲनिहिलेशन ऑफ कास्ट (जातीचा उच्छेद) मध्ये लक्ष वेधले आहे. जातिसंस्था ही श्रमविभागणी नसून श्रमिकांचीसुद्धा विभागणी असल्याने ती कृत्रिम आहे. त्यामुळे हिंदू जनसमुदाय समाज या संस्थेलाच प्राप्त होऊ शकला नाही. हिंदू समाज म्हणजे विविध जातींचा एक पुंजका होय. हिंदू समाजाचे हे स्वरूप व्यक्ती विकासाला आणि उत्पादन पद्धतीला मारक आहे, या अर्थाचे डॉ. आंबेडकरांचे विश्लेषण ध्यानात घेतले की, आज विविध मार्गांनी होणारी जातीय संमेलने व जातजाणिवा बळकट करण्याचे उपक्रम सामाजिक ऐक्याला तडा देणारे आहेत हे स्पष्ट होते. जातीसंस्थेने बद्ध झालेल्या हिंदू समाजात एका नव्या प्रबोधन चळवळीची त्यांना गरज वाटत होती.या प्रबोधनाची व्याप्ती सखोल असली पाहिजे ही त्यांची धारणा होती. जातिसंस्था नष्ट करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणून आंतरजातीय विवाहाकडे डॉ.आंबेडकर पाहताना दिसतात.

भारतामध्ये वाढत झालेली जातीय विषमता बघता आज घडीला महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची सांगड घालून नवभारताची निर्मिती करणारा विचार प्रत्येक भारतीयांनी जोपासला पाहिजे हीच अपेक्षा...

*********

महेश महादेव देवळे
वाशिम
९९६०४११९८३

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लातूर शहर भूमिगत गटार योजना, वाढीव पाणी पुरवठा योजनेचे दूरदृश्य प्रणालीद्वारे भूमिपूजन

## औसा शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचेही ऑनलाईन भूमिपूजन







लातूर :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत लातूर शहर भूमिगत गटार योजना व वाढीव पाणी पुरवठा योजना, तसेच औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झाले. नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथील कार्यक्रमातून प्रधानमंत्री यांनी या योजनांचे भूमिपूजन केले. यावेळी केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर उपस्थित होते. लातूर येथील कार्यक्रमाला लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, श्रीमती कांचन तावडे, मुख्य लेखा अधिकारी रावसाहेब कोलगणे, नगररचनाकार निकिता भांगे, सहायक आयुक्त अजित डोपे, निर्मला माने यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अमृत २.० अभियान अंतर्गत लातूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी २५९ कोटी रुपये निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेंतर्गत लातूर शहरातील वाढती लोकसंख्या गृहीत धरून विस्तारित लातूर शहरास सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी धनेगाव हेडवर्क्स ते हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. लातूर शहर भुयारी गटार योजनेसाठी अमृत २.० अभियान अंतर्गत ३०५ कोटी १९ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. लातूर शहरातील भूमिगत गटार योजनेतून शहरातील सांडपाण्याचे योग्य नियोजन करून, तसेच कव्हा येथे ५३ एमएलडी एसटीपी प्रकल्प उभारून सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.

औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचेही भूमिपूजन

औसा शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी अमृत २.० अभियान अंतर्गत ४३ कोटी ४ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आज या योजनेचे भूमिपूजन केले. यानिमित्त औसा येथे आयोजित कार्यक्रमाला आमदार अभिमन्यू पवार, औसा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या योजनेतून याकतपूर रोड येथे नवीन जलकुंभ उभारणी, शहराच्या वाढीव हद्दीतील व जुन्या शहरात कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या भागातील वितरण व्यवस्था बदलणे, जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे, शहरातील ८० किलोमीटर वितरण व्यवस्थेचे काम केले जाणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पुरेशा दाबाने व नियमित पाणीपुरवठा होणार आहे.

# लातूर म.न.पा.च्यावतीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न







लातूर : क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर व ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूल द्वारा आयोजित मनपा जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूल लातूर येथे दि.२९ व ३० सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. या कबड्डी क्रीडा स्पर्धे चे कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश बिरादार (चेअरमन ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूल, लातूर) या कार्यक्रमाचे आयोजक चंद्रकांत लोदगेकर (जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, लातूर), प्रमुख पाहुणे सोनू डगवले (दिशा प्रतिष्ठान-अध्यक्ष), अॅड.सिद्धू धायगुडे , शिवाजीराव कोंडमगीरे (राज्य परिवहन महामंडळ लातूर विभागाचे नाट्यकलावंत व राष्ट्रीय खेळाडू (कबड्डी)), शास्त्री चव्हाण (लातूर जिल्हा कबड्डी असोसिएशन तालुका रेणापूर-अध्यक्ष) ग्यानदेव कोंडमगीरे (ज्ञानेश्वरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष), सतीश लोभे (कबड्डी मार्गदर्शक) सुजित बिरादार (मॅनेजिंग डायरेक्टर) यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून व ध्वजारोहन करून राष्ट्रगीताने सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी सोनू डगवले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बोलतांना शिवाजीराव कोंडमगीरे म्हणाले की, मला या ठिकाणी बोलवून आपण जो माझा आदर सत्कार केला आहे त्याचा मी आपणा सर्वांचा सदैव ऋणी असेन असे म्हणत कबड्डी खेळाडूंनी खेळातील कौशल्य दाखविताना आपल्या जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठावे अशी असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. तर ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलचे प्रशासकीय अधिकारी रामेश्वर सगरे व त्यांच्या टिमचे आभार व्यक्त करून सर्व खेळाडू व मार्गदर्शक यांना शुभेच्छा दिल्या तसेच सर्व सहकारी म्हणून कबड्डी पंच यांनाही शुभेच्छा दिल्या. चंद्रकांत लोदगेकर यांनी आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत करत सर्व खेळाडूंना व मार्गदर्शक यांना शुभेच्छा देत ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूल, लातूर या शाळेला खेळाडूंसाठी मॅट देण्याचे आश्वासन दिले. कबड्डी ग्राउंडवर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ग्राउंड वर पूजा करून श्रीफळ फोडण्यात आले. व कबड्डी स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेसाठी एकूण ६७ संघ उपस्थित होते. वयोगट १४ वर्षे, १७ वर्षे आणि १९ वर्षे वयोगटातील मुलांची व मुलींची कबड्डी स्पर्धा यावेळी संपन्न झाली. १४ वर्षे वयोगटातून मुलांच्या संघातून श्री श्री रविशंकर विद्यालय, लातूरचा संघ प्रथम आला तर द्वितीय म्हणून ज्ञानप्रकाश विद्यालय, लातूर, १७ वर्षे वयोगटात प्रथम आलेला संघ, स्वामी विवेकानंद विद्यालय लातूर तर द्वितीय आलेला संघ, केशवराज विद्यालय लातूर, १९ वर्षे वयोगटातून प्रथम आलेला संघ दयानंद सायन्स महाविद्यालय, लातूर तर १९ वयोगटातील द्वितीय आलेला संघ राजर्षी शाहू विद्यालय लातूर. मुलींच्या संघातून १४ वर्षे गटातून ग्लोबल नॉलेज पब्लीक स्कूल लातूरचा संघ प्रथम आला तर द्वितीय म्हणून श्री श्री रविशंकर इंग्लिश स्कूल लातूर तर १७ वर्षे वयोगटातून प्रथम आलेला संघ श्री श्री रविशंकर इंग्लिश स्कूल लातूर तर द्वितीय श्री किशन सोमाणी विद्यालय, लातूर तर १९ वर्षीय वयोगटातून दयानंद कला विद्यालय, लातूर तर द्वितीय महात्मा बसवेश्वर विद्यालय, लातूरचा संघ आला आहे. या सर्व उत्तीर्ण खेळाडूंचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. या खेळाडूंना प्रमुख मार्गदर्शन आंतरराष्ट्रीय खेळाडू कर्णधार ४ वेळा गोल्ड मेडल प्राप्त केलेल्या तथा अर्जुन पुरस्काराने सन्मानीत महाराष्ट्रातील पहिल्या महिला सौ.सारिकाताई काळे (खोत), ग्लोबल नॉलेज पब्लीक स्कूल सांस्कृतीक विभाग प्रमुख रामेश्वरी कदम व कबड्डीचे राष्ट्रीय खेळाडू आणि राज्यस्तरीय कबड्डी पंच शिवाजीराव कोंडमगिरे यांच्या हस्ते बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी पंचप्रमुख धनंजय नागरगोजे, प्रदीप मुसांडे, दिनकर क्षीरसागर, प्रदिप अकनगिरे, सुजित माळी, भूषण भावे, सुरज बंडगर, विठ्ठल गुरमे, व्यंकट बोंबडे, दयानंद सारोळे, निखिल काळे, आदित्य कवी, गणेश शिरसाठ, आदित्य पेठकर, बालासाहेब शेप, अच्युत काळे व विशाल कांबळे यांनी उत्कृष्टरित्या पंचाचे कार्य केले. याप्रसंगी विजेता कबड्डी संघ व उपविजेता कबड्डी संघाचे हार्दिक हार्दिक अभिनंदन करण्यात आले. या कबड्डी स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अॅड.रामेश्वर सगरे यांनी केले. या स्पर्धा यशस्वी संपन्न करण्यासाठी शाळेची क्रीडा शिक्षक विठ्ठल गुरमे, विशाल कांबळे यांनी अथक परिश्रम घेतले.

# दिवाळीत लाडक्या बहिणींना मिळणार ३ हजार; अजितदादांनी दिला शब्द




मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या तिसऱ्या हप्त्याचे पैसे लाभार्थ्यी महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिवाळीत भाऊबीजेची ओवाळणी म्हणून लाडक्या बहिणींना ३ हजार रूपये देण्याचे अश्वासन दिले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी येत्या आठ-दहा दिवसांत आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेत लाडकी बहीण योजनेच्या तिसरा आणि चौथ्या टप्प्यातील हप्त्याचे वाटप कधी सुरू होणार, असा प्रश्न केला जात होता. तसेच तिसरा आणि चौथा हप्ता एकत्र जमा करण्याची शक्यता वर्तविली जात होती. मात्र रविवारी आणि सोमवारी तिसऱ्या हप्त्याची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाली. विशेष म्हणजे तांत्रिक कारणांमुळे ज्यांना पहिले दोन हप्ते मिळाले नाहीत अशांच्या खात्यात तीन हप्त्यांची एकत्रित रक्कम जमा करण्यात आली आहे. यानंतर आता पुढील हप्त्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी बीड येथील सभेच मोठे वक्तव्य केले आहे. काय म्हणाले अजित पवार? बीड येथील सभेत अजित पवार म्हणाले की, लाडकी बहिणींना पहिल्यांदा तीन हजार दिले. त्यानंतर सप्टेंबरचे पैसे आले आता ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे पैसे १० ऑक्टोबरच्या आत भाऊबीजेची ओवाळणी म्हणून बहिणींच्या खात्यात जमा होईल असा शब्द देतो.

# अँटी-एजिंग वापरून पन्नाशीतही दिसा तरुण



आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, त्वचा आणि चेहऱ्यावरील वृद्धत्वाची लक्षणे टाळण्यासाठी कॉस्मेटिक उत्पादनांऐवजी घरात सहज उपलब्ध असलेल्या अँटी-एजिंग गोष्टींचा वापर करून फायदे मिळू शकतात. या नैसर्गिक उत्पादनांचे दुष्परिणाम होण्याचा धोका नाही आणि सर्व वयोगटातील लोकांना त्याचा फायदा होऊ शकतो. यासाठी तुम्हाला जास्त पैसे खर्च करण्याची गरज नाही. घरातच असलेल्या अनेक गोष्टींमध्ये प्रभावी अँटी-एजिंग गुणधर्म आढळून येतात, ज्याचा वापर चेहरा आणि त्वचा तरुण ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो.

वाढत्या वयानुसार, त्वचेवर आणि चेहऱ्यावर त्याचा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो. चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे, त्वचेवर सुरकुत्या पडणे आणि चेहऱ्याची चमक कमी होणे ही वाढत्या वयात दिसणारी स्पष्ट लक्षणे आहेत. अशा समस्या टाळण्यासाठी आपण सर्वच प्रकारची केमिकलयुक्त क्रीम्स आणि सौंदर्य उत्पादने वापरत असतो. या उत्पादनांमध्ये ज्याप्रकारे रसायने आणि प्रतिबंधित घटक आढळून आले आहेत, त्यामुळे दीर्घकाळ शरीराला अनेक प्रकारच्या समस्यांचा धोका निर्माण होऊ शकतो, असे या अभ्यासात आढळून आले असले, तरी सर्वांनी याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे.

कोरफडमधील वृद्धत्व विरोधी गुणधर्म

कोरफड म्हणजेच एलोवेरा एक शक्तिशाली अँटी-एजिंग एजंट म्हणून वर्षानुवर्षे वापरला जात आहे, ज्यामध्ये अनेक सक्रिय एन्झाइम्स, खनिजे आणि जीवनसत्त्वे तुमच्या त्वचेला निरोगी आणि तरुण ठेवण्यासाठी विशेष फायदेशीर आहेत असे मानले जाते. ऍनाल्स ऑफ डर्मेटोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात, शास्त्रज्ञांनी ४५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ३० निरोगी महिलांमध्ये सुरकुत्या आणि त्वचेच्या इतर समस्या कमी करण्यावर कोरफडच्या प्रभावांची तपासणी केली. या अभ्यासाच्या ९० दिवसांनंतर, असे आढळून आले की ज्या महिलांनी कोरफडीचा वापर केला त्यांच्या त्वचेत चांगली सुधारणा दिसून आली.

काकडी त्वचेसाठी फायदेशीर

त्वचेशी संबंधित अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यासाठी काकडी प्रभावी असल्याचे आढळून आले आहे. काकडीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात, तसेच त्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन-सी आणि फॉलिक ऍसिड सारख्या पोषक घटकांचा त्वचेला निरोगी ठेवण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित विकार कमी करण्यासाठी विशेष फायदा होतो. २०११ च्या अभ्यासात असे आढळून आले आहे की काकडीमधील अँटीऑक्सिडंट घटक त्वचेशी संबंधित विविध विकारांचा धोका कमी करून सुरकुत्याविरोधी एक संभाव्य मदत करतात.

मध त्वचेसाठी वरदान

अभ्यासात संशोधकांना असे आढळून आले की, चेहऱ्यावर मध लावणे आणि त्याचे सेवन करणे या दोन्ही गोष्टी त्वचेच्या समस्यांमध्ये फायदेशीर ठरू शकतात. मध त्वचेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकते. हे सुरकुत्या तयार होण्यास प्रतिबंध करण्यास मदत करू शकते, ज्यामुळे त्वचा वयानुसारही तरुण दिसते. त्वचेच्या संसर्गाचा धोका टाळण्यासाठी मध लावण्याचे फायदे देखील दिसून आले आहेत.

दुधाचा वृद्धत्वविरोधी प्रभाव

त्वचेच्या समस्यांचा धोका कमी करण्यासाठी दूध हे सर्वात प्रभावी अँटी-एजिंग गुणधर्मांपैकी एक मानले जाते. दुधामध्ये रेटिनॉल नावाचे एक संयुग असते, जे एक प्रभावी अँटी-एजिंग एजंट आहे आणि निरोगी त्वचा राखण्यासाठी तुम्हाला विशेष फायदा होऊ शकतो. व्हिटॅमिन-डी दुधामध्ये देखील आढळते ज्यामध्ये दाहक-विरोधी प्रभाव असतो आणि त्वचेशी संबंधित अनेक प्रकारचे धोके कमी करण्यासाठी ते आपल्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. दुधाची साय त्वचेवर लावल्याने फायदा होतो.

# कांद्याचा रस लावल्याने खरेच नवीन केस येतात का?

रुणांमध्ये केस गळणे आणि टक्कल पडण्याची समस्या झपाट्याने वाढत आहे. आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, बिघडलेली जीवनशैली आणि आहारातील पोषणाचा अभाव यामुळे अशा समस्या लोकांमध्ये अधिक दिसून येत आहेत. केसगळती थांबवण्याचा आणि केसांच्या वाढीस प्रोत्साहन देणारी अनेक कॉस्मेटिक उत्पादने विकली जात आहेत,

परंतु ते खरोखर कार्य करतात का?

दरम्यान, केस निरोगी ठेवण्यासाठी कांद्याचा रस लावण्याच्या पद्धतीबाबत सध्या बरीच चर्चा आहे. असे म्हटले जात आहे की, कांद्याच्या रसाने दररोज बाधित भागाची मालिश केल्याने केस गळणे थांबतेच पण नवीन केसांची पुन्हा वाढदेखील होते.



अमेरिकन ऍकॅडमी ऑफ डर्मेटोलॉजीच्या मते, केस गळणे ही स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही सामान्य स्थिती आहे. केस गळणे किंवा केस गळण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे एन्ड्रोजेनेटिक एलोपेशिया नावाची अनुवांशिक स्थिती. याशिवाय काही औषधांच्या दुष्परिणामांमुळे किंवा हार्मोनल समस्यांमुळेही केस गळू शकतात.

कांद्याचा रस केसांच्या अनेक समस्या जसे की टाळूची खाज सुटणे किंवा कोरडे होणे, केस गळणे, कोंडा, केस अकाली पांढरे होणे आणि नवीन केस वाढण्यास मदत करू शकतो.

तथापि, केसांच्या वाढीसाठी कांद्याचा रस वापरण्यावर व्यापक संशोधन झालेले नाही. तथापि, जर्नल ऑफ डर्माटोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या एका लहानशा अभ्यासात असे दिसून आले आहे की, कांद्याचा रस टाळूवर लावल्याने काही लोकांमध्ये केस पुन्हा वाढण्यास मदत होऊ शकते. या अभ्यासात अशा सहभागींचा समावेश होता ज्यांना अलोपेसिया एरियाटा होता, ज्यामध्ये केस पॅचमध्ये गळतात.

कांद्याचा रस दिवसातून दोनदा वापरल्यानंतर २ आठवड्यांनंतर केसांची वाढ सुरू झाल्याचे संशोधकांना आढळले. सुमारे ७४ टक्के सहभागींना ४ आठवड्यांनंतर केस पुन्हा वाढले, आणि सुमारे ८७ टक्के लोकांना ६ आठवड्यांनंतर केस पुन्हा वाढण्याचा अनुभव आला.

कांद्याचा रस केसांना लावल्याने केसांच्या मुळांना पोषकसत्त्वे मिळून त्यांची मजबुती सुधारते, असे संशोधकांचे म्हणणे आहे. हे केस तुटणे आणि पातळ होणेदेखील कमी करू शकते. कांद्यामध्ये असलेले सल्फर हे कांद्याचा रस केसवाढीस मदत करते असे मानले जाते. एंजाइम आणि प्रथिनांच्या पुरेशा उत्पादनासाठी सल्फर आवश्यक आहे. कांद्याच्या रसामध्ये असलेले सल्फर केसांच्या वाढीसाठी आवश्यक पोषण पुरवू शकते.

केसांच्या वाढीसाठी आणि कंडिशनिंगसाठी कांद्याचा रस वापरल्याने काही लोकांना फायदा होऊ शकतो; परंतु ते सर्वांसाठी फायदेशीर असू शकत नाही. याशिवाय कांद्याचा रस वापरल्याने केसांची वाढ लवकर होत नाही. त्याचा सकारात्मक परिणाम होण्यासाठी काही आठवडे देखील लागू शकतात, परिणाम मिळणेदेखील आवश्यक नाही. केसगळतीचे कारण आणि त्यावर आधारित उपचार पद्धती जाणून घेण्यासाठी त्वचारोग तज्ज्ञांची मदत घ्या.

# वन जमीनीत शेतीसोबत गांजाची झाडे पिकवणाऱ्या शेतावर धाड



किनवट/शेख शोकत :–वनजमीनीचा पट्टा शेती करून खाण्यासाठी दिला असतांना किनवट तालुक्यातील डोंगराळ भागातील काही गावांमध्ये काही लोकांनी त्याच्यावर गांजा उगवला. आज पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप, पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार यांच्या मार्गदर्शनात भोकरचे अपर पोलीस अधिक्षक डॉ. खंडेराय धरणे यांनी स्थानिक गुन्हा शाखेचे पथक आणि त्यांचे स्वतःचे पोलीस अंमलदार यांनी धाड टाकली. सकाळपासून सुरू असलेला धाड सत्राचा। कार्यक्रम अद्यापही सुरू केली. पोलीसांनी तेथे लाईटची सोय करून गांजाची मोजणी केली. पोलीसांना प्राप्त झालेल्या माहितीनुसार आज पोलीसांनी किनवट तालुक्यातील डोंगरगाव आणि दिग्रस या गावात अत्यंत गुप्तपणे प्रवेश केला. अनेक टेकड्या पार करून पोलीस तेथे पोहचले आणि गांजाची लागवड असलेल्या शेतीजवळ वेडा टाकला. स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरिक्षक यांच्यासह त्यांचे पथक दिग्रस आणि डोंगरगाव येथे गेले आणि गांजाची झाडे ज्यांच्या शेतात लावली आहेत. त्या लोकांचा शोध घेत आहेत. सकाळपासून सुरू असलेल्या या गांजा धाड सत्राची कार्यवाही सुर्यास्तानंतर सुध्दा संपलेली नाही होती. रात्रीच्या अंधारात तेथे त्रास होईल म्हणून पोलीसांनी उजेडाची सोय सुध्दा केलेली होती आणि वेगवेगळ्या वनजमीनींच्या पट्यांची तपासणी केली आहे. गांजाची झाडे दिसू नये म्हणून त्या गांजांच्या झाडांना शेतकऱ्यांनी इतर पिकांच्या मध्ये उगवले आहे. पण सुतावरुन स्वर्ग गाठणाऱ्या पोलीसांनी ही गांजाची झाडे शोधली आहेत. आतापर्यंत गांजाची मोजदाद सुरू असल्याने गांजाचे पुर्ण वजन कळाले नाही. पण गांजाचे वजन जास्तच असणार कारण गांजाची जीवंत झाडे पोलीसांनी पकडली आहेत आणि ती झाडे शेतात असल्याने ते झाडे ओली असतात आणि त्यांचे वजन जास्तच असते. पोलीसांनी केलेल्या या कार्यवाहीचे कौतुक करायलाच हवे. डोंगरगाव आणि दिग्रस ता. किनवट येथे वन विभागाच्या जमीनीमध्ये शेती करून अन्य धान्य पिकवण्याऐवजी शेतकऱ्यांनी त्यात गांजाची झाडे पिकवून लवकर श्रीमंतीकडे वाटचाल केली. या वाटचालीतील म्होरक्या किनवट तालुक्यातील एक पोलीस पाटील असल्याची माहिती खात्रीलायक सुत्रांनी दिली आहे. पोलीस पाटलांची नियुक्ती यासाठीच केली असते की, गावागावात होणाऱ्या भानगडी, अवैध धंदे याबद्दलची माहिती पोलीसांना देणे ही त्याची जबाबदारी असते. आता त्यामुळे इतर शेतकऱ्यांनी सुध्दा आपल्या शेतांमध्ये अर्थात वन जमीनीम ध्ये गांजाची झाडे उगवून श्रीमंतीकडे जाण्याचा तयार केलेल्या वाटेवर पोलीस कार्यवाहीने अडथळे आले आहेत.

# साहित्यिक उत्तम तरकसे हे सावित्रीबाई फुले साहित्यभूषण पुरस्काराने सन्मानित



पुणे तळेगाव दाभाडे :– मराठी साहित्य मंडळ आयोजित ७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे तळेगाव दाभाडे येथील श्रीरंग कलानिकेतन सभागृहात मोठ्या दिमाखात साजरे झाले.

सदर साहित्य संमेलनात महाराष्ट्र राज्य शासनाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक उत्तमराव दासु तरकसे (असरडोहकर) यांच्या स्वकथनपर धुळीतून शिखराकडे या कादंबरीस क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमास उपस्थित प्रमुख अतिथी राम कांडगे (माजी आमदार चाकण) सुरेश लोहार (ज्येष्ठ कवी) डॉ. श्रीमती नेहा राजेंद्र कुलकर्णी (चेअरमन श्रीरंग कलानिकेतन) डॉ. जयप्रकाश घुमटकर उर्फ कवी गोल घुमट ठाणे (ज्येष्ठ साहित्यिक) श्री सतीश साठे (अध्यक्ष चंद्रकिरण काव्य मंडळ तळेगाव) श्रीकृष्ण पुरंदरे (अध्यक्ष मराठी साहित्य परिषद तळेगाव दाभाडे) ह्या मान्यवराच्या हास्ते सदरचा पुरस्कार श्री उत्तम दा. तरकसे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

सदर संमेलनात अध्यात्म आणि विज्ञान याची सांगड कशी घालावी यावर परिसंवादात अध्यक्ष डॉक्टर सुधीर पांडे (पुणे) व प्रमुख वक्ते डॉ. नीता बोडके (पुणे) आणि वृषाली आठल्ये (पुणे) यांनी मोलाचे विचार मांडले तसेच निमंत्रित राज्यस्तरीय कवी संमेलन सुद्धा खूप जल्लोषात सादरीकरण झाले सदर कार्यक्रमाचे संपूर्ण भारतातून साहित्यिक व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने सभागृहातील सभागृह अगदी खचून भरला होता मराठी साहित्य मंडळाचे वतीने उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## रावसाहेब पांतगे महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी



वसमत:रावसाहेब पतंगे महाविद्यालयात प्राचर्य पांचाळ सर, प्रा.डॉ रमाकांत शातलवर ,प्रा.जाधव सर प्रा. नवघरे सर , प्रा.आळणे मिलिंद समतादूत ,प्रा वैशाली खंदारे मॅडम.प्रा.आकाश गायकवाड प्रा येरगे सर. विजय राऊत शाम मोरे. मोठया संखेने विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कडून अभिवादन



लातूर/ प्रतिनिधी :– लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त तसेच भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त दि.०२ ऑक्टोबर बुधवार रोजी सकाळी कॉंग्रेस भवन लातूर येथे विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या व भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेस लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ड किरण जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले तसेच सर्व उपस्थित मान्यवरानी देखील विनम्र अभिवादन केले. यानंतर शहरातील महात्मा गांधी चौक येथिल राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले . यावेळी सुभाष घोडके,कैलास कांबळे,इम्रान सय्यद, ड.देविदास बोरुळे पाटील,प्रा.प्रवीण कांबळे, प्रा. सुधीर आणवले,आसिफभाई बागवान,युनूस मोमीन, तबरेज तांबोळी,शेख कलीम,रईस टाके,सुलेखाताई कारेपूरकर,कमलताई मिटकरी,करुणा शिंदे,सिकंदर पटेल,खाजामियाँ शेख,ड.अंगदराव गायकवाड, पिराजी साठे,श्रावण मस्के,युसूफभाई बाटलीवाले, जय ढगे,अकबर माडजे,अभिषेक पतंगे,विष्णुदास धायगुडे,कुणाल वागज,युसूफ सय्यद,बब्रुवान गायकवाड,संजय सुरवसे,योगेश देशमुख,संदीपान सूर्यवंशी,मंगेश वैरागे,आबू मणियार,अमोल गायकवाड,राजू गवळी,फारूक शेख,राहुल देशमुख, आकाश मगर,नागनाथ डोंगरे,जफर पटवेकर,श्रीकांत गर्जे,करीम तांबोळी,सोमनाथ तोटाळे यांच्यासह लातुर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या विविध सेलचे पदाधिकारी, सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.



लातूर जिल्ह्यातील पाटबंधारे विभाग क्रं १, सिंचन भवन लातूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी केली, या वेळी कार्यकारी अभियंता अमर पाटील, उपकार्यकारी अभियंता नितीन बी पाटील, शाखा अभियंता अमित कुलकर्णी व विभागातील कर्मचारी सावंत, सुनील गायकवाड, दळवी, पुर नियत्रंण कक्षातील गर्जे मॅडम, निलंगेकर मॅडम उपस्थित होते..

# नायर रुग्णालयाचे डीन डॉ. सुधीर मेढेकर यांच्या हस्ते प्रदीप दादा साळवे सन्मानित



मुंबई :– आंबेडकर कुटुंबाचे शिलेदार, आंबेडकरी चळवळीतील खंदे कार्यकर्ते, श्रध्येय बाळासाहेब आंबेडकर, मा. भिमराव आंबेडकर व सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांचे आत्येभाऊ, बहुजन सेवा संघाचे माजी अध्यक्ष, रिपब्लिकन सेना दक्षिण मुंबईचे कोषाध्यक्ष, नायर हॉस्पिटलचे प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ कर्मचारी आदरणीय प्रदीप दादा साळवे यांचा ५८ वा वाढदिवस व सेवानिवृत्तीचा कार्यक्रम रिपब्लिकन सेना दक्षिण मुंबई व नायर रुग्णालय कामगार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नायर रुग्णालयाचे डीन मा. डॉ सुधीर मेढेकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी नायर रुग्णालयातील कर्मचारी, युनियन कार्यकर्ते, रिपब्लिकन सेना दक्षिण मुंबई अध्यक्ष भगवान साळवी, उपाध्यक्ष भाई जोशी, सचिव महेंद्र पवार, प्रसिद्धी प्रमुख मंगेश जाधव, मोहन जाधव, दर्शन जाधव, संघटक किशोर साळवी, कार्यकारणी मंडळ आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नायर रुग्णालयाचे डीन डॉ. सुधीर मेढेकर यांच्या शुभहस्ते प्रदीप दादांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. आंबडेकरी कुटुंबाशी जवळचे नाते असणारे प्रदीप दादा म्हणजे नायर रुग्णालयात येणाऱ्या अनेक गोरगरिब रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी निस्वार्थी मदतीचा हात होता, त्यांच्याकडे येणाऱ्या सर्व गोरगरीब रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना ते मोलाचे सहकार्य करीत सोबतच रुग्णालयातील बहुजन सेवा संघ या संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम बघताना ही त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी कामगारांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडून कायद्याच्या चौकटीत राहून त्यांना न्याय मिळवून दिला, कट्टर आंबेडकरवादी व बौद्ध असल्याचा अभिमान केवळ बाळगण्यासाठी नसून किंवा फक्त जय भीम म्हणण्यापूरता मर्यादित नसून तो एक जाज्वल्य अभिमान आहे हे त्यांनी कृतीतून सिद्ध करून दाखवले त्याचेच जिवंत उदाहरण म्हणजे नायर रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या हॉलमध्ये असलेली तथागत गौतम बुद्धांची मूर्ती जी प्रदीप दादांच्या अथक परिश्रमातुन आज नायर रुग्णालयात स्थापन झालेली आहे अशी अगणित कामे प्रदीप दादांनी निस्वार्थीपणे व कोणत्याही प्रसिद्धीची हाव न धरता केली आहेत. कालकथित भाई संगारे व अखिल भारतीय सेनेचे संस्थापक सदस्य अरुण गवळी (डॅडी) यांच्याशी प्रदीप दादांचे जवळचे संबंध होते त्यामुळे राजकीय क्षेत्रात ही दादांनी उल्लेखनीय कामगिरी केली होती परंतु मा. भाई संगारेंच्या अकस्मात मृत्यूनंतर प्रदीप दादा राजकारणापासून लांब झाले; अश्यातच भाई संगारेंच्याच स्मृतिदिनी रिपब्लिकन सेनेच्या भगवान साळवी यांची ओळख दादांसोबत झाली व असे धडाडीच्या कार्यकर्त्यांची समाजाला गरज आहे हे ओळखून त्यांना रिपब्लिकन सेनेत घेण्याची ईच्छा त्यांनी रिपब्लिकन सेना संस्थापक आनंदराज आंबेडकर यांना बोलून दाखवली तेव्हा आनंदराज म्हणाले की दादा सरळमार्गी, प्रामाणिक व आंबेडकरी घराण्याशी एकनिष्ठ व्यक्ती आहे अश्या व्यक्तींची गरज पक्षाला आहे जर ते येत असतील छानच आहे, त्यानंतर प्रदीप दादांनी रिपब्लिकन सेनेत प्रवेश करीत दक्षिण मुंबईचे कोषाध्यक्ष म्हणून काम पाहू लागले त्यानंतर आनंदराज आंबेडकर साहेबांच्या नेतृत्वाखाली झालेले इंदू मिल आंदोलन व अनेक इतर आंदोलनात प्रदीप दादांनी हिरिरीने सहभाग घेतला त्यांचा वाढदिवस व सेवानिवृत्ती असे दोन्ही कार्यक्रम एकाच दिवशी असल्याने वाढदिवसाच्या आनंदासोबतच दादांच्या सेवानिवृत्तीचे दुःख अश्या सुख–दुःख्याच्या संमिश्र भावना उपस्थितांच्या मुखावर स्पष्ट दिसत होत्या. सरतेशेवटी रिपब्लिकन सेनेचे दक्षिण मुंबईचे अध्यक्ष भगवान साळवी यांनी उपस्थितीतांचे आभार मानून प्रदीप दादा साळवे जरी नायर रुग्णालयातून सेवानिवृत्त होत असले तरी सामाजिक, राजकीय कार्यातून ते कधीच सेवानिवृत्त होणार नाही सेवानिवृत्ती नंतर ते सामाजिक, राजकीय अश्या सर्वच क्षेत्रात दुप्पट उत्साहाने काम करतील अशी ग्वाही देत कार्यक्रमाची सांगता केली.

## वंचितच्या बेलापूर तालुका अध्यक्ष पदी सुनील भोले तर उपाध्यक्षपदी कल्याणराव हनवते यांची निवड



नवी मुंबई / के. एच. हनवते :– वंचित बहुजन अघाडी राष्ट्रीय अध्यक्ष : अँड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर याच्या आदेशानुसार व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रेखाताई ठाकुर व नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलीप (भाई) बंदीचोडे यांनी बेलापूर तालुका कार्यकारणी जाहीर केली, बेलापूर तालुका अध्यक्ष पदी : सुनील भोले तर कल्याणराव हनवते यांची बेलापूर तालुका उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली असून बेलापूर महासचिव पदी : गौतम चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल बेलापूर तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# सुमेध (बप्पा) शिंदे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन.! केज शहरातील युवा नेतृत्व हरवल्याने केज शहर गहिवरले. अंत्य संस्कारासाठी जमला प्रचंड जनसमुदाय



केज/ प्रतिनिधी केज शहरातील फुलेनगर येथे वास्तव्यास असणारे तथा नगरसेविका पदमीनबाई शिंदे यांचे सुपुत्र सुमेध (बप्पा) शिंदे यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक १ ऑक्टोबर रोजी घडली. केज नगरपंचायतच्या नगरसेविका पदमीनबाई (आक्का) शिंदे यांचे चिरंजीव सुमेध शिंदे हे बप्पा नावाने सर्व परिचित होते. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये ते सक्रिय होते. दरम्यान, मंगळवार दिनांक १ ऑक्टोबर रोजी दुपारी त्यांना राहत्या घरीच हृदयविकाराचा तीव्र झटका आला. आणि त्यानंतर त्यांना आंबेजोगाई येथे उपचारासाठी हलवण्यात आले होते. मात्र या हृदयविकाराच्या धक्क्याने त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सुमेध (बप्पा) शिंदे हा एक दलित चळवळीतील एक निर्भीड कार्यकर्ता होता. तो काल अचानक आपल्यातुन निघून गेल्याने दलित समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सुमेध (बप्पा) यांच्या जाण्याने कधीही न भरुन येणारी पोकळी निर्माण झाली आहे.त्यामुळे सर्व समाजामधुन हळहळ व्यक्त होत आहे. सुमेध (बप्पा) शिंदे यांचा स्वभाव सर्वांमध्ये मिसळत असल्याने व सर्वधर्मसमभाव या आशयाने पाहणारे त्यांचा मित्रपरिवार केज तालुक्यात मोठ्या प्रमाणात असल्याने सर्व मित्र परिवारातून सुमेध (बप्पा) शिंदे यांना जड अंतकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याची वेळ येत आहे. असे मित्रपरिवारातून बोलले जात होते. त्यांच्या पार्थिवावर केजच्या क्रांतीनगर येथील सार्वजनिक स्मशानभुमीत काल दि.२ ऑक्टोबर बुधवार रोजी सकाळी १०:०० अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कधी नव्हे ते एखाद्या नेत्याच्या सभेला देखील एवढा जनसमुदाय जमला नसेल. एवढा प्रचंड जनसमुदाय सुमेध (बप्पा) शिंदे यांच्या अंत्यविधी साठी जमला होता.या वेळी सुमेध (बप्पा) शिंदे यांचे विषयी प्रत्येकाचे हृदय भरुन येत असल्याने कोणाही काही बोलु शकले नाहीत. सर्वांनी शाश्रूंनयनांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला..

# राज्यात मान्सूनच्या पावसाचा भेदभाव! सर्वदूर धोधो पण एकाच जिल्ह्यात कमी पाऊस

राज्यात यंदा मान्सूनच्या पावसाने चांगली हजेरी लावली आहे. यंदाच्या मान्सून हंगामात पावसामध्ये जास्त खंड पडला नाही. तर वेळोवेळी दमदार पावसाने हजेरी लावल्यामुळे राज्यभरातील सर्वच जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला आहे.

तर सप्टेंबर अखेरपर्यंत राज्यात सरासरीपेक्षा २६ टक्के अधिकचा पाऊस पडला आहे.

दरम्यान, राज्यातील केवळ एकाच जिल्ह्यात सरासरीपेक्षा पाऊस कमी पडल्यामुळे मान्सूनच्या पावसाचे वितरण असमान झाल्याचे चित्र आहे. तर राज्यातील कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. राज्यातील सर्वच धरणांनी शंभरी ओलांडल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

येणाऱ्या तीन महिन्यात म्हणजे ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातही दक्षिण भारतात ११२ टक्क्यांपेक्षा अधिक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर महाराष्ट्रातही सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार आहे. पण महाराष्ट्रातील हिंगोली या जिल्ह्यामध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे. सरासरीच्या तुलनेत उणे २० ते उणे ५० टक्क्यांच्या दरम्यान पाऊस हिंगोली जिल्ह्यात पडला आहे.

सप्टेंबरच्या सुरूवातीला हिंगोली जिल्ह्यामध्ये दमदार पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे येथे पुर आला होता. या पुरामध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. पण विदर्भातील कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे ही स्थिती निर्माण झाली होती. इतर काळात हिंगोलीमध्ये मोठा पाऊस खूप कमी वेळा पडला आहे, यामुळेच येथे सरासरीपेक्षा कमी पाऊस आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE